Shri Sharda Bhavan Education Society’s
Shankarrao Chavan Mahavidyalaya, Ardhapur.
NATIONAL SERVICE SCHEME
Report on Blood Donation Camp
**Nagpur Road Ardhapur, Tq. Ardhapur, Dist. Nanded-431602 M. S. India**
(Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

---

## ❖ रक्तदान व रक्तगट तपासणी शिबिर अहवाल

**महाविद्यालयाचे नाव:** शंकरराव चव्हाण महाविद्यालय अर्धापूर.
**विभाग:** राष्ट्रीय सेवा योजना
**दिनांक:** 14/07/2025
**वेळ:** 09.00 सकाळी.
**ठिकाण:** शंकरराव चव्हाण महाविद्यालय अर्धापूर.

**प्रस्तावना:**




शंकरराव चव्हाण साहेबांनी घर परिवाराची चिंता न करता हैदराबाद मुक्तिसंग्रामात स्वतः झोकून देऊन स्वातंत्र्यसैनिक म्हणून अमूल्य कार्य केले. ते स्वतंत्र भारतात नगराध्यक्ष, आमदार, खासदार राज्याचे दोन वेळेस मुख्यमंत्री, केंद्रातील विविध मंत्री ते गृहमंत्री पर्यंत त्यांनी केलेले कार्य व त्यांनी जीवनात अंगीकारलेले तत्व याचं अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा ते आपल्या जीवनासाठी प्रेरणादायी ठरेल, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.करुणा देशमुख यांनी व्यक्त केले ते शंकरराव चव्हाण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक विभाग व माजी विद्यार्थी संघ यांच्यावतीने आयोजित भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री जलसंस्कृतीचे जनक श्रद्धेय कै.डॉ.शंकररावजी चव्हाण साहेब यांच्या १०५ व्या जयंती कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. व्यासपीठावर



सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. साईनाथ शेटोड, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. नीलकंठ लांडे आणि डॉ.काजी मुक्तारोद्दिन, माजी विद्यार्थ्यांनी संघाचे समन्वयक डॉ. रघुनाथ शेटे, क्रीडा संचालक डॉ.विक्रम कुंटूरवार, डा ॅ.ल.ना.वाघमारे, डॉ.संगीता घुगे व डॉ. विनोद शिंदे यांची प्रमुख उपस्थित होती. महाविद्यालयात जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केलेले होते. राष्ट्रीय सेवा योजना रक्तदान व रक्तगट तपासणी शिबिर आयोजित केले होते. यात डॉ.शंकररावजी चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी नांदेड येथील डॉ.रूपाली कळसरे डॉ.सुमित कामटलवार, नवनाथ कापसे, कुणाल




महागडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी यांनी रक्त संकलन केले. तर गंगाखेड येथील लाईफ केअर क्लिनिक लॅबोरेटरीचे गजानन राठोड व अनिकेत जाधव यांनी रक्तगट तपासणी केली. या शिबिरास विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. विविध क्षेत्रात नाव कमावलेल्या १०५ माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.शंकरराव चव्हाण साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. काजी मुख्तारोद्दिन यांनी केले. सूत्रसंचालन डा ॅ.रघुनाथ शेटे यांनी केले तर आभार डॉ.साईनाथ शेटोड यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. करुणा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नीलकंठ लांडे प्रा आणि . डॉ. काजी मुख्तारउद्दीन यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.



हिंगोली, परभणी, नांदेड, बीड जिल्ह्यातून स्वतंत्रपणे प्रकाशित होणारे विभागीय पातळीवरील दैनिक

# गाववाला

संस्थापक संपादक : उत्तमराव दगडू

R.N.I No. MAH MAR /2013/49618 | gmail: gaonwala@rediffmail.com, gaonwaladaily@gmail.com | ८ पाने

नांदेड | वर्ष १३ वे अंक क्रं. ८७ | गुरूवार दि. १७ जुलै २०२५ | किंमत ३ रु.

## अर्धापूरात शंकरराव चव्हाण महाविद्यालयात श्रध्देय डॉ.शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान करून अभिवादन

अर्धापूर/गुणवंत विरकर

अर्धापूर शहरातील शंकरराव चव्हाण महाविद्यालयात भारताचे माजी गृहमंत्री, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, मराठडचाचे भाग्यविधाते श्रध्देय डॉ शंकरराव चव्हाण यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात रक्तदान करून अभिवादन करण्यात आले.

भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री जलसंस्कृतीचे जनक श्रद्धेय कै.डॉ.शंकररावजी चव्हाण यांच्या १०५ व्या जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ करूणा देशमुख ह्या होत्या तर व्यासपीठावर सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. साईनाथ शेटोड, कार्यक्रमाधिकारी डॉ.काजी मुक्तारोद्दिन, माजी विद्यार्थ्यांनी संघाचे समन्वयक डॉ. रघुनाथ शेटे, क्रीडा संचालक डॉ.विक्रम कुंटूरवार, डॉ.ल.ना.वाघमारे, डॉ.संगीता घुगे व डॉ. विनोद शिंदे यांची प्रमुख उपस्थित होती. महाविद्यालयात जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केलेले होते. राष्ट्रीय सेवा योजना व सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्यावतीने रक्तदान व रक्तगट तपासणी शिबिर आयोजित केले होते. यात डॉ.शंकररावजी चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी नांदेड येथील डॉ.रूपाली कळसरे डॉ.सुमित कामटलवार, नवनाथ कापसे, कुणाल महागडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी यांनी रक्त संकलन केले. तर गंगाखेड येथील लाईफ केअर क्लिनिक लॅबोरेटरीचे गजानन राठोड व अनिकेत जाधव यांनी रक्तगट तपासणी केली. या शिबिरास विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. विविध क्षेत्रात नाव कमावलेल्या १०५ माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.शंकरराव चव्हाण साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. काजी मुख्तारोद्दिन यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.रघुनाथ शेटे यांनी केले तर आभार डॉ.साईनाथ शेटोड यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







| | | |
|---|---|---|
| **कार्यक्रम अधिकारी** | **कार्यक्रम अधिकारी** | **प्राचार्य** |
| ( राष्ट्रीय सेवा योजना ) | (राष्ट्रीय सेवा योजना ) | शंकरराव चव्हाण महाविद्यालय अर्धापूर. |
| डॉ. एन. डी.लांडे | डॉ. एम. के. काझी | डॉ. करुणा देशमुख |